'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue - 264 : India's Sustainable Development Goal in 21st Century
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April-2021

# जागतिकीकरण : उच्चशिक्षण महत्त्व, समस्या व आव्हाने

**डॉ. शिवाजी थोर**
Ph.D, M.Phil.,M.Com., M.A.(Eco),M.A.(Pol),
M.A.(Mar)., G.D.C.& A., B.Ed.(Gen), B.Ed.(Phy)
Head of Department of Comm.
Research Guide Pune University (Bus Adm & Business Practices)
Arts Science & Commerce College, Manmad
Tal. Nandgaon, Dist: Nashik (M.S.)
Mob. 7263982785
E-Mail. I.D : drshivajithore217@gmail.com

**प्रा. प्रकाश बड**
NCC Officer
Asst. Prof. Dept of Geography
Arts Science & Commerce College, Manmad
Tal. Nandgaon, Dist: Nashik (M.S.)
Mob. 72196667902
Email ID : prakashgeo03@gmail.com

## 1) प्रस्तावना

21 व्या शतकातील जागतीक स्वरूपाची तंत्रज्ञान, संगणक व विज्ञानाची भरारी लक्षात घेता भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेत, अभ्यासक्रमात बदल करून जगाच्या स्पर्धेत कसे टिकेल यशस्वी होईल. व आदर्श नेता देशासाठी बनेल तसेच रोजगार निर्मिती होईल. व्यापार, व्यवसाय व उद्योजकता वाढ विकास व वृध्दी होईल या दृष्टीने उच्च शिक्षणात योग्य पद्धतशीर बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे काळाची गरज आहे यासाठी देशातील लहान-मोठ्या सर्व क्षेत्रात सर्वांगीण प्रगती होण्यासाठी संशोधन केले पाहिजे. यातून देशाचा विकास साधता येइल व भारत एक महाशक्तीशाली देश म्हणून उभा राहील.

जागतिकीकरणाच्या प्रगतीमुळे सर्वजण जवळ आले आहे. तसेच जागतीक पातळीवर ज्ञानाचे क्षेत्र विस्ताराने वाढत असून सोशल मीडियाच्या माध्यमातून विचारांची देवाण-घेवाणसहज शक्य झाले आहे या माध्यमातून हवी ती माहिती उपलब्ध करता येते व स्पर्धाका बरोबर टिकून वाढीव स्पर्धा करता येते. याउलट त्यातून परावलंबनही झाल्याने शिक्षण क्षेत्रात पाहिजे त्या प्रमाणात गुणात्मकतेला संधी नाही हे वास्तव सध्या दिसून येते. यामुळे उच्च शिक्षणातील व्यवस्था भरीव न रहाता ती पोकळ स्वरूपाची आहे हे निदर्शनास येते. आज सर्वच क्षेत्रातील पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेतलेला विद्यार्थी जगाच्या स्पर्धेत टिकू शकत नाही व आजची आव्हाने स्वीकारून यशस्वी होत नाही हे क्षणोक्षणी दिसुन येते, हि उणिव दूर होण्यासाठी प्रात्यक्षिक अभ्यासक्रम तयार केला पाहिजे तसेच ज्ञानाधिष्ठित समाज निर्मितीत शिक्षणाचा वाटा अधिक असणे आवश्यक आहे त्यासाठी शिक्षण उपयोगी पडणे, यांचा विचार गंभीरपणे करणे आवश्यक आहे.

शिक्षण मानवाला सुसंस्कृत बनविते हे मात्र खरे आहे पण त्या शिक्षणातून सुसंस्कृत समाज बनला का ? तर यात संशोधन होणे काळाची गरज आहे यासाठी शिक्षणातील जाणकारांनी जागृत होणे गरजेचे आहे परंतु ते होताना दिसत नाही आज शिक्षण क्षेत्रात खासगीकरणामुळे तफावत वाढत चाललेली दिसून येते त्यामुळे लोकशाहीतुन उच्च शिक्षणाची प्रगती ,वाढ ,विकास, वृद्धी झालेली दिसून येत नाही. यासाठी उच्च शिक्षणासाठी संक्षिप्त संशोधन व विचार मंथन होणे काळाची गरज आहे.

या प्रस्तुत संशोधन शोध निबंधातून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उच्च शिक्षणातील महत्त्व, समस्या व आव्हाने यातून संशोधकाने या समस्येवर प्रकाश झोत टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

## 2) उद्देश

1. उच्च शिक्षणाचा विकास करणे.
2. उच्च शिक्षणाचे महत्त्व अभ्यासणे.

## 3) गृहितके

1. उच्च शिक्षणाचा विकास होत आहे.
2. उच्च शिक्षणाचे महत्त्व दिसून येत आहे.